# असं खरंच घडलं असेल का?

**लेखक: सुहास फणसे**

सायंकाळी फिरायला जाण्यात, आणि तेही श्यामरावांसारख्या बडबड्या असामी बरोबर, एक निराळीच मजा असते. व्यायाम तर होतोच शिवाय जगातील निरनिराळ्या विषयांवरती चर्चा करण्याची संधीही मिळते. माझ्या आणि श्यामरावांच्या चर्चेत एक वेगळीच रंगत भरते कारण आम्ही दोघेही एकमेकांनी व्यक्त केलेल्या विचारांशी कधीच सहमत होत नाही. विषम विचारांची देवाणघेवाण झाली नाही तर मग ती चर्चा कसली!

रोजच्या शिरस्त्याप्रमाणे काल संध्याकाळीही मी श्यामरावांच्या घरासमोर येऊन हाक मारली तेव्हां श्यामराव व-हांड्यातल्या आरामखुर्चीवर, चेहेऱ्यावर वर्तमानपत्राचं पांघरूण घालून, माझीच वाट पाहत बसले होते. तोंडावरचे वर्तमानपत्र दूर करून ते उठले. आरामखुर्चीवर लटकविलेला शर्ट घालत ते बाहेर पडले. कॉलनी पार करून, थोड्याच वेळात आम्ही 'हाय-वे'वर आलो. नेहमीप्रमाणे 'हाय-वे' येईपर्यंत आम्ही चुपच होतो.

काही महिन्यांपूर्वी माझा आणि श्यामरावांचा परिचय झाला तो दिवस मला अजूनही

आठवतो. मागचे काही दिवस ज्या गतीने मी चालत होतो, त्याबद्दल मी थोडा नाखुषच होतो. वेग वाढविण्याचा मी जाणीवपूर्वक प्रयत्न करत होतो पण पाहिजे तो वेग ठेवणे कठीण जात होते. शंभर एक पाउले तो वेग टिकायचा पण काही वेळाने वेग कमी झाल्याचे लक्षात यायचे.

त्या दिवशी 'हाय-वे'वर येताच आपलीचालण्याची गती वाढविण्याचा निर्धार करून मी झपझच चालायला सुरुवात केली. आपण खूप वेगाने चालत आहोत, या आनंदात असतांना एक दोन व्यक्तींना मी पार करून गेलो व मनातल्या मनात मीच माझी पाठ थोपटली.  मान आपोआपच ताठ झाली आणि त्याच क्षणी माझी दृष्टी श्यामरावांवर पडली, अर्थात ते श्यामराव आहेत, हे मला तेव्हां माहित नव्हतं.

पायात कोल्हापुरी चपला, पांढरं धोतर, पांढराच शर्ट आणि डोक्यावर पांढऱ्या केसांचं आवरण, अशी श्वेतमुर्ती नजरेत भरली नसती तरच नवल! माझ्या पुढे, चाळीस पन्नास फुटांवर, श्यामराव, तरुणांनाही लाजवेल, अशा वेगात रस्ता कापीत होते. थोडय्ाच वेळात माझ्या लक्षात आलं की आमच्यामधलं अंतर हळूहळू वाढू लागलं होतं. नेहेमीप्रमाणे आपलं चालणं मंदावलं की काय?, असं वाटून मी चालण्याचा वेग वाढविला. आमच्या दोघांमधलं अंतर कायम ठेवायचा मी कसोशीने प्रयत्न करू लागलो.

माझ्या चालण्याचा वेग नेहेमीपेक्षा वाढला होता. हे वाढलेल्या श्वासोश्वासाने माझ्या लक्षात आले. पण या गतीनं चालण्यात मला वेगळाच आनंद येत होता. आमच्यातलं अंतर कायम ठेवण्याचे माझे प्रयत्न मात्र वारंवार विफल होत होते. अंतर वाढलं की मी थोडंसं अंतर धावत जाऊन ते आटोक्यात आणीत असे. इतक्या दूर राहून श्यामरावांच्या गतीने चालणे कठीण आहे, हे माझ्या लक्षात आले. त्यावर तोडगा म्हणून मी धावायला लागलो. श्यामरावांपासून चार पाच फुटावर आल्यावर, धावणे सोडून, मी चालायला लागलो. श्यामरावांशी 'कदम से कदम' मिळवून मी त्यांचा सावलीप्रमाणे पाठलाग सुरू केला. श्यामरावांचा डावा पाय पुढे तर माझाही डावा पाय पुढे. शिस्तित पाय टाकीत मी श्याम- रावांच्या गतीने चालण्यात यश मिळविले.

अशी वीस पंचवीस पाउले आम्ही दोघांनी बरोबरीने टाकलीत आणि साहजिकच कोणीतरी आपला पाठलाग करत आहे, हे श्यामरावांच्या लक्षात आले. 'ओवरटेक' करू देण्यासाठी श्यामरावांनी, रस्त्याच्या डावीकडे होत, जागा करून दिली. पण मला त्यांच्यासमोर जायचे नव्हते. ती पण डावीकडे वळत श्यामरावांच्या पाठीमागे राहिलो. श्यामरावांनी चालण्याचा वेग कमी केला. मी पण. पाठीमागची व्यक्ती मुद्दाम आपला पिच्छा करीत आहे, हे त्यांच्या लक्षात आले.

कोणीतरी आपला पाठलाग करत आहे, हे लक्षात आले की निरनिराळे विचार मनात येतात. पण सर्वात आधी

वाटते ती भिती. हृदयाची धडधड वाढते, स्नायू ताठ होतात, माणूस बेचैन होतो. श्यामरावांचंही बहुधा असंच झालं. पाठीमागच्या व्यक्तीकडून आपल्याला धोका तर नाही ना?, या मनातल्या शंकेच्या पालीला पळवून लावण्यासाठी श्यामरावांनी मागे वळून पाहिले.

आमचं

असं होणार, याची मला जाणीव होती. सुहास्य मुद्रेने मी त्यांच्या नजरेस नजर मिळविली आणि म्हणालो, ‘नमस्कार! आपल्या फिरण्यात व्यत्यय तर नाही आणला?’ सुदैवानं माझ्या चेहऱ्यात किंवा व्यक्तीमत्वात भिण्यासारखे काही नसावे.  माझ्या प्रश्नाला त्यांनी हसत उत्तर दिले, ‘म्हंटलं, पाठीमागून कोणी भामटा तर येत नाही ना?’ या वेळेपर्यंत आम्ही दोघेही बरोबर चालायला लागलो होतो.

‘आपल्या चालण्याच्या वेगाने मी आकर्षित झालो होतो. खूप वेगाने दररोज चालण्याची माझी कितीतरी दिवसांपासून इच्छा होती. स्वत:चा वेग वाढविण्यासाठी मी आपला पाठलाग करत होतो.’, मी पाठलागाची कारणमीमांसा श्यामरावांना सांगितली.

मी केलेल्या प्रशंसेने श्यामराव खुष झाले. आपला चालण्याचा वेग आणखी वाढवून त्यांनी खुष झाल्याची पावती दिली. मला दम लागत होता. पण मी तेज चालणे रेटीत होतो. एकमेकांची ओळख करून घेण्यात थोडे आणखी अंतर पार पडले. मी त्यांच्याच कॉलनीत राहतो, हे कळल्यावर

श्यामरावांना आनंद झाला. दुसऱ्या दिवसांपासून दोघांनी बरोबर फिरायला जाण्याचे ठरले. इतके दिवस रटाळ वाटणारी संध्याकाळची रपेट श्यामरावांच्या संगतीत रंगतदार होणार होती. आम्ही बोलत बोलत, 'हाय-वे' सोडून, आमच्या कॉलनीत प्रवेश केला श्यामरावांचं घर प्रथम आलं. त्यांनी चहाचा आग्रह केला पण मला, श्यामराव नावाचं अस्त्र, संध्याकाळी फिरतांना, वापरायचे होते. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी सहा वाजता भेटण्याचं आश्वासन देऊन मी त्यांचा निरोप घेतला.

श्यामरावांना बोलायला विषयांची कमतरता नव्हती. फिरायला निघालं की एखादं संपादकीय, लेख, वाचकांचे मनोगत किंवा तत्कालीन वादग्रस्त असलेला विषय, हे साधारणत: बोलण्याचे विषय. श्यामरावही अधूनमधून अशाचपैकी एखाद्या विषयावर बोलत. पण बहुधा श्यामराव चाकोरीबाहेरच्या विषयांना पसंत करीत. माझं काम, एकवाक्यी भाष्य करीत, श्यामरावांच्या बोलण्याच्या गाडीचा ॲक्सलरेटर फिरविण्याचं होतं. श्यामरावांबरोबर 'फॉर्मेशन'मध्ये 'कदम से कदम' मिळविण्यात व त्यांच्या वाक्लहरींशी माझं श्रवणयंत्र 'फाईन ट्यून' करण्यात मी थोड्या परिश्रमाने यश मिळविले. श्यामरावांच्या शब्दलहरींबरोबर माझ्या मेंदूच्या तारा थोड्याच दिवसात मेळ खाऊ लागल्या. श्यामरावांच्या कंठ-जीभ-ओठांच्या वाद्यवृंदाशी मी पूर्णपणे समरस व्हायला लागलो.

आमचा असा व्यायाम-कम-वार्तालाप काही महिने चालला. काही कारणाने मला बाहेरगावी जावे लागले व त्यात खंड पडला. जवळजवळ दोन महिन्यांनी मी परतलो. श्यामरावांबरोबर संध्याकाळी फिरायला जाण्यासाठी मी उत्सुक होतो. फिरायला जाण्यासाठी मी तयार होत असतांना ही मला म्हणाली, ‘ फिरायला निघाला का?’ फिरून येतांना भाजीबीजी आणणे मला बिलकूल आवडत नाही, हे हिला चांगलं माहित आहे. मी त्रासिक मुद्रेने तिच्याकडे पाहिले.

‘अहो, सामान बिमान आणायला सांगत नाहीये मी. फिरायला जाणार असला तर ‘हाय-वे’वर जाऊ नका, असं मी सांगणार होते’ मी आश्र्चर्याने हिच्याकडे पाहू लागलो.

‘पंधरा दिवसांपूर्वी श्यामरावांना अपघात झाला. ‘हाय-वे’वरच! फिरायला गेले असतांना! तुम्ही येथे नव्हता, ते बरेच झाले! त्यांच्याबरोबर तुम्हीही असता तर काय झालं असतं?, या विचारानंच मला पंधरा दिवस झोप लागत नाहिये’, ही म्हणाली.

‘अगं! मी असतो तर अपघातच झाला नसता, असा विचार का नाही करत?’, मी हिला विचारले.

‘तुमचं पुरुषांचं आपलं असंच! इकडे एका माणसाची काळजी करीत पंधरा दिवस देवाचा धावा केला, ते गेलं कुणीकडे, माझीच टिंगल करताहेत.’, ही फणकारली. या विषयावर पुढे बोलण्यात अर्थ नव्हता. हिच्या समाधानासाठी

मी फिरायचा बेत रद्द केला. श्यामरावांची तब्येत पाहण्यासाठी मी बाहेर पडलो.

श्यामरावांच्या मुलानेच दार उघडले. काही न बोलता त्याने श्यामरावांच्या खोलीकडे निर्देश केला. त्याच्या चेहेऱ्या वरून परिस्थिती गंभीर दिसत होती. प्रशस्त पलंगावरील पांढऱ्या शुभ्र गादीवरची श्यामरावांची काळवंडलेली कृश मूर्ती पाहून मला धक्काच बसला. अर्धवट मिटलेले डोळे, नाकात लावलेली नळी, लोहाराच्या भात्याप्रमाणे वर-खाली होणारी छाती. श्यामराव भेटण्याच्या, बोलण्याच्या पलिकडच्या स्थितीत गेले होते. श्यामराव बेशुद्धावस्थेत, निश्चेष्ट पडले होते. कोम्यामध्ये गेले होते.

माझं डोकं सुन्न झालं. परगावी जाण्याच्या तीन-चार दिवस आधीची संध्याकाळ आठवली. श्यामरावांना कोम्यात पाहून माझा विश्वासच बसत नव्हता. त्या संध्याकाळी श्यामराव थोड्याश्या भावूक मनस्थितीतच फिरायला बाहेर पडले होते. 'हाय-वे'वर आल्यावर त्यांनी विचारलेल्या प्रष्नाने मी दचकलोच.

'तुम्ही कधी कोम्यामध्ये गेलेला माणूस पाहिला आहे का?', इति श्यामराव. 'सुदैवानं नाही! कधीकाळी वर्तमानपत्रातून थोडंफार मी अशा दुर्दैवी व्यक्तींबद्दल वाचलय. एक इंग्रजी कादंबरी या विषयावर आहे. तुमच्या वाचनात आली वाटतं अलिकडे!' आज श्यामरावांनी निवडलेल्या विषयाचं मूळ शोधण्यासाठी मी श्यामरावांना विचारलं.

'नाही हो! मागच्या महिन्यात आमच्या घरी ज्ञानेश्वरीचा पाठ झाला. किती लहान वयात त्यांना गीतेचं आकलन झालं! काय अगाढ बुद्धी असेल त्यांची! गेले कित्येक दिवस ज्ञानेश्वर माझ्या रक्तात भिनले आहेत.'

ज्ञानेश्वरांना न भेटलेला रेडा बहुधा मीच असावा. संस्कृत मधली श्रीकृष्णांची गीता काय किंवा त्या काळच्या मराठीतील ज्ञानेश्वरी काय, मला ग्रीक-लॅटीनमधल्या युलिसीससारखी अपरिचित होती. पण 'बंदी मुट्ठी लाखकी...' ही माझी आवडती म्हण! मी नुसता हुंकार भरला.

'किती लहान वयात समाधी घेतली त्यांनी! तुम्हाला समाधी घेणं म्हणजे काय हे माहित आहे का?', श्यामरावांच्या या प्रश्नाला उत्तर देण्याचं मी टाळलं. तेही उत्तराची अपेक्षा करीत नव्हते. श्यामराव बोलतच होते., 'स्वेच्छामरण! किती सरळ सोपं स्पष्टीकरण! बहुतेक भक्तगणांना त्यापुढे विचार करण्याची जरूरच भासत नाही.'

श्यामराव माझ्याशी बोलतच नव्हते. ते आपल्या मनाशी बोलत होते. 'जर स्वतःच्या इच्छेने मृत्यूला आमंत्रण द्यायचे, एवढा साधासुधा अर्थ असता तर भक्तगणांच्या साक्षीने तळघरात स्वतःला कोंडून घेऊन, नियोजित समयी, स्वतःला यमदेवाच्या स्वाधीन करायचा आटापिटा अशा थोर संतमहात्म्यांनी केला नसता.', श्यामरावांचा आवाज आता गंभीर झाला होता.

‘समाधी घेण्यामध्ये स्वेच्छामरणा पेक्षा काहीतरी जास्त अभिप्रेत आहे. कोम्यामधल्या व्यक्तींबद्दल वाचलं आणि माझ्या डोक्यात प्रकाश पडला. कोम्यामध्ये असतांना मेंदू शरीराच्या फक्त मूलभूत गरजा भागवू शकतो. इतरांच्या दृष्टीने बाकीचा मेंदू निष्प्रभ झालेला असतो.’, श्यामरावांचे स्वत:च्या तंद्रीतले बोलणे चालूच होते. ‘समाधी घेणं म्हणजे मेंदूला मूलभूत गरजा भागविण्याचे काम सोपवून आत्म्याला अवकाशात भ्रमण करायला मोकळं सोडणं. या स्थितीत शरीराचा आणि आत्म्याचा संपूर्ण संपर्क-विच्छेद होत नसेल कारण शरीराच्या खोगीराचा त्याग करायचा निश्चय अजून झालेला नसतो.’, श्यामराव आज एका आगळ्याच धुंदीत बोलत होते.

‘अवकाशात गेलेले अंतराळवीर, एका केबलद्वारे अवकाशयानाशी संपर्क ठेवीत, अंतराळात चालण्याचा अभ्यास करतात. तसेच ज्ञानेश माउलीसारखे संत आपल्या आत्म्याच्या पुष्पक विमानात बसून तारमंडलाचे भ्रमण करीत असतील’

‘शरीरात वास करीत असतांना आत्म्याला भौतिक आनंदाची ओळख झालेली असते. शरीरापासून दूर राहून आत्मा त्या अमृतानंदाचा शोध घेत असेल.’, श्यामराव स्वत:तरी धरतीवर आहेत का?, याची मला शंका आली. आपल्या बोलण्यात ते इतके समरस झाले होते की नेहमीचा परतण्याचा किलोमिटरचा दगड त्यांना दिसलाच नाही. मी

त्यांच्या विचारात बाधा आणायची नाही, असे ठरवून चालत राहिलो.

काय मजा येत असेल! शरीराचं ओझं नाही, भौतिक बंधनं नाहीत. इंद्राच्या स्वर्गपुरीचा शोध घेत तारमंडळात--सौरमंडळाच्या पलीकडे--अगदी आकाशगंगेच्या पलीकडे स्वच्छंदपणे भरारी मारायची. स्वर्गातील दालनांचे सुवर्णकलश दृष्टीपंथात आले की शरीराशी असलेली संपर्क-तार सूक्ष्म लहरींद्वारा तोडायची, शीतकवच उघडायचं---', श्यामरावांशी माझा संपर्क तुटला होता. नेहेमीपेक्षा आम्ही पुष्कळ पुढे गेलो होतो. श्यामरावांचा दंड धरूनच मी त्यांना परतीच्या मार्गावर आणले.

'श्यामराव, मला एक सांगा. स्वर्गपुरीच्या धावपट्टीवर ज्ञानेश्वरांचे विमान उतरायला किती वेळ लागला असेल हो? कारण कोम्यामध्ये माणसे सहा सात वर्षेसुद्धा राहिल्याची नोंद आहे म्हणतात.' श्यामरावांचं विमान क्रॅशलॅंड करण्याचा मी प्रयत्न केला.

'त्यांना किती वेळ लागला?, हे तर मला माहित नाही पण मरायचंच असेल तर दहा-पंधरा दिवस, कोम्यामध्ये, अंतराळाची सेर करायला मला आवडेल.', श्यामराव म्हणाले.

'काहीतरीच काय बोलताहात, श्यामराव! संतांचे अशाप्रकारे स्वेच्छामरण मी समजू शकतो पण आजारामुळे किंवा अपघातामुळे कोम्यात जाणाऱ्या व्यक्तीचा मुख्य

कम्प्युटर बिघडलेला असतो. मग अशी व्यक्ती कशी काय सेर करू शकेल?', मी माझी रास्त शंका व्यक्त केली.

'अहो, असं आपले डॉक्टर आणि शास्त्रज्ञ म्हणतात. मेंदूच्या कम्प्युटरचा शरीरावर फक्त न्यूनतम कंट्रोल राहतो म्हणून त्यांच्या दृष्टीने तो कम्प्युटर कुचकामीच ठरायचा. माझी तर ठाम समजूत झाली आहे की कोम्यात गेलेल्या व्यक्तीचा आत्मा अंतराळात भ्रमण करायला मोकळा होतो.', श्यामरावांनी माझ्या शंकेची विल्हेवाट लावली. आमच्या त्या दिवशीच्या वार्तालापाला थोडं जास्तच गंभीर वळण लागलं होतं.

श्यामरावांची तब्येत बघायला डॉक्टर आले म्हणून माझी समाधी भंग पावली. मी स्वत:ला सावरलं. श्यामरावांच्या तब्येतीबद्दल डॉक्टरांशी चर्चा केली. डॉक्टरांनी सांगितले की मृत्यू केव्हांही येऊ शकतो. अगदी आत्ता, नाहीतर दिवस-आठवडे-महिने किंवा काही वर्षांनीसुद्धा. वाट पाहण्याखेरीज दुसरा पर्याय नव्हता. माझ्या डोक्यात एक विचार चमकला. मी डॉक्टरांना विचारलं, 'डॉक्टर, अशा परिस्थितीत पेशंटला ऐकू येतं का? मला श्यामरावांशी बोलायचे आहे.' माझं बोलणं डॉक्टरांना आणि श्यामरावांच्या कुटुम्बियांना विचित्र वाटलं असलं पाहिजे. 'ऐकू येतही असेल कदाचित! पण त्यांनी तसं सांगितल्याशिवाय आपल्याला कसे कळणार?', डॉक्टरांच्या या उद्‌गारांनी माझी आशा दुणावली.

'काका, बोलून घ्या मनसोक्त. बाबा काही तुमच्याबरोबर फिरायला येऊ शकणार नाहीत आता', श्यामरावांचा मुलगा म्हणाला. श्यामरावांचा हात हातात घेऊन मी त्यांच्याजवळच्या खुर्चीवर बसलो. डॉक्टरांना व श्यामरावांच्या कुटुम्बियांना मी तिथेच राहायला सांगितले.

'नमस्कार श्यामराव! माझा आवाज तुम्ही ओळखलाच असेल.' श्यामरावांची प्रतिक्रिया पाहण्यासाठी सर्वजण श्यामरावांकडे बारकाईने पाहू लागले. श्यामरावांनी उत्तर देण्याचा प्रयत्न केला असला तरी आम्हाला दिसला नाही.

'श्यामराव! आज मी बोलणार आणि तुम्ही नुसतं ऐकत राहायचं! इतरांना म्हणू द्या की तुम्ही कोम्यात आहात! पण मला माहित आहे की तुम्ही समाधी घेतली आहे. त्या दिवशी तुम्ही केलेलं समाधीचं विश्लेषण मला पटलं. कामचलाऊ शरीर येथे ठेऊन तुम्ही तारमंडळात सेर करताहात, हे मला ठाऊक आहे. तुमच्या आत्म्याचा, देहाशिवाय भ्रमण करण्याचा, या मागच्या पंधरा दिवसात खूप अभ्यास झाला असेल.', मी म्हणालो.

'त्या दिवशी तुम्ही व्यक्त केलेली इच्छा देवाने लगेच पूर्ण केलीय. प्रकाशापेक्षाही अधिक गतीने जाणारे तुमचे विमान स्वर्गलोकाजवळ पोहोचले असेल. त्या अपघाताच्या क्षणी जरी तुम्ही तत्काल समाधीमध्ये गेला असलात तरी त्या ट्रकच्या धडकीमुळे तुमच्या सुपर कम्प्यूटरला थोडीशी ईजा झालेली दिसतेय. मला अशी शंका येतेय की तुमचं विमान

स्वर्गलोकाभोवती घिरट्या घालतंय. स्वर्गलोकाचे बाह्य आवरण छेदून आत शिरण्याचे तुमचे प्रयत्न असफल होत आहेत’

‘श्यामराव! मला सांगितलेलं आठवा! जो पर्यंत तुम्ही तुमच्या देहातील, सुपर कम्प्यूटरला जोडलेला सूक्ष्म लहरींचा कम्यूनिकेशन रेडिओ बंद करीत नाही तो पर्यंत स्वर्गपुरीच्या धावपट्टीवर उतरण्याची परवानगी चित्रगुप्त तुम्हाला देणार नाही. सदेह स्वर्गात जायला आपण धर्मराज थोडेच आहोत, असं तुम्हीच ना म्हणाला होता!’

खोलीमध्ये शांतता पसरली होती. घामाने माझा शर्ट ओलाचिंब झाला होता. डॉक्टरांच्या नजरेत काहीतरी आलं. स्टेथोस्कोप कानाला लावून डॉक्टर पुढे सरसावले. लोहाराच्या भात्यासारखी फास-फूस करणारी श्यामरावांची छाती शांत होत होती. श्वासोश्वासाचा वेग हळूहळू कमी होऊ लागला. डॉक्टर स्टेथोस्कोपने हृदयाचा शोध घेऊ लागले.

माझे डोळे श्यामरावांच्या डोळ्यांवर खिळले होते. श्यामरावांच्या चेहऱ्या वरचे भाव बदलताहेत, असा बहुतेक मला भास झाला. त्यांच्या पापण्या किंचित उघडल्या, क्षणभरच! माझे डोळे श्यामरावांच्या नजरेशी भिडले. श्यामरावांच्या चेहऱ्या वर किंचित स्मित झळकलं. निदान मला तरी तसं वाटलं. डॉक्टरांची लगबग वाढली. श्यामरावच्या छातीवर निरनिराळ्या ठिकाणी स्टेथोस्कोप कानाला लावून छातीचे ठोके ऐकण्याचा प्रयत्न ते करत होते.

डॉक्टरांनी हलक्या हाताने श्यामरावांच्या पापण्या बंद केल्या आणि डॉक्टर मटकन खुर्चीवर बसले. श्यामरावांचा मृत्यू डॉक्टरांना अपेक्षित होता पण तो अशाप्रकारे येईल, यावर डॉक्टरांचा विश्वास बसत नव्हता.

इतकी वर्षे उलटली पण अजूनही त्या दिवशी जे काही घडलं व मुख्य म्हणजे ज्याप्रकारे घडलं त्याची योग्य कारणमीमांसा मला करता आलेली नाही. शरीर कोम्यात ठेवून आत्म्याला असं भटकता येत असेल का?

वैज्ञानिक दृष्टीकोनातून श्यामरावांचा सिद्धांत असंभव वाटतो. श्यामरावांच्या डॉक्टरांना तर तो प्रसंग बोलाफुलाच्या गाठीचाच प्रकार वाटतो. मीही माझ्या मनाची समजूत घालायचा प्रयत्न करतो परतुं दरवेळी माझं मन उसळी खाऊन विरोध करतं. मनाच्या कुठल्यातरी कोपऱ्या त असं वाटतं की श्यामरावांचा सिद्धांत खरा पण असेल. श्यामरावांनी माझं बोलणं ऐकलंसुद्धा असेल. काही का असेना, श्यामरावांच्या घुटमळणाऱ्या जीवाला अवकाशात विलीन होण्यास आपण मदत केली असणार, असा विचार मनात आला की चित्त कसं शांत होतं.

+++